**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक २३ फेब्रुवारी २०२६**

**ठळक बातम्या**

1. **बुलढाणा जिल्ह्यातील शेगांव इथं आयोजित आयुष मंत्रालयाच्या राष्ट्रीय आरोग्य मेळ्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते 25 फेब्रुवारीला होणार उद्घाटन.**
2. **राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या अभिभाषणाने प्रारंभ.**
3. **युवाशक्ती हीच भारताच्या प्रगतीची खरी ओळख असल्याचं माझी लष्करप्रमुख जनरल मनोज पांडे यांचं अमरावती इथं प्रतिपादन.**
4. **विदर्भात अनेक ठिकाणी अवकाळी पावसाने पिकांचं नुकसान.**

------------------------------------------

**राष्ट्रीय आरोग्य मेळा**

भारत सरकारच्या आयुष मंत्रालय आणि अखिल भारतीय आयुर्वेदिक कॉंग्रेस यांच्या संयुक्त विद्यमानं, बुलढाणा जिल्ह्यातील संतनगरी शेगाव इथं २५ ते २८ फेब्रुवारी दरम्यान, चार दिवसीय राष्ट्रीय आरोग्य मेळा-२०२६ आयोजित करण्यात येणार आहे. या मेळ्याचे उद्घाटन, २५ फेब्रुवारी रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते संत गजानन महाराज संस्थानच्या विसावा मैदानावर होणार आहे. या आरोग्य मेळ्याचा उद्देश आयुष पद्धतींचा प्रसार करणे, नागरिकांना मोफत आरोग्यसेवा देणे आणि औषधी वनस्पतींच्या लागवडीद्वारे शेतकऱ्यांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करणे हा आहे. मेळ्यात आयुर्वेद, योग-निसर्गोपचार, युनानी, सिद्ध, सोवा-रिग्पा आणि होमिओपॅथी अशा विविध आयुष पद्धतींमधून, मोफत तपासणी, सल्ला आणि औषधे उपलब्ध असतील. तसंच आरोग्य विषयक प्रदर्शने, तज्ज्ञांची व्याख्याने, योग प्रात्यक्षिके आणि थेरपी काउंटर नागरिकांसाठी खुले असणार आहेत. २७ फेब्रुवारी रोजी दुपारी तीन वाजता शेतकऱ्यांसाठी आयुर्वेदिक शेती, उत्पादन आणि विपणन या विषयावर विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी, शेतकऱ्यांना औषधी वनस्पती लागवडीकडे वळण्याचे आवाहन केले आहे.

------------------------------------------

**राज्यपाल आचार्य देवव्रत अभिभाषण**

राज्य विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला आज मुंबईत राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या अभिभाषणाने सुरुवात झाली. महाराष्ट्र देशातलं अग्रणी औद्योगिक राज्य

असल्याचं, राज्यपालांनी यावेळी नमूद केलं. विकसित महाराष्ट्रासाठी २०२६ ते २०३० या कालावधीसाठी महाराष्ट्र उद्योग सेवा धोरण राबवलं जाईल, ज्याद्वारे राज्यात ५० लाख प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती करणं उद्दिष्ट असल्याचं त्यांनी सांगितलं. देशाच्या जीडीपीमध्ये राज्याचं योगदान साडेतेरा टक्क्यांपेक्षाही जास्त असून, थेट परदेशी गुंतवणूकीपैकी ३९ टक्के गुंतवणूक राज्यामध्ये झाली आहे, असं ते म्हणाले. यावर्षी स्वित्झर्लंडमधल्या दावोस इथं झालेल्या परिषदेत १८ देशांच्या विविध उद्योगांसोबत राज्याचे ३० लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे करार झाले असून, यामुळे ४० लाख रोजगार निर्माण होतील, अशी अपेक्षा राज्यपालांनी व्यक्त केली. राज्यात झालेल्या परकीय गुंतवणुकीबद्दल माहिती देताना ते म्हणाले,

***(होल्ड बाईट - राज्यपाल आचार्य देवव्रत)***

कृषी उत्पादकता वाढवण्यासाठी कृत्रिम बुध्दिमत्ता प्रणालीचा वापर केला जात असून, बंदर विकास जहाज निर्मिती क्षेत्रासाठी विशेष धोरण आखण्यात आल्याचं राज्यपालांनी सांगितलं. महाराष्ट्र कर्नाटक सीमावाद सोडवण्यासाठी राज्य सरकार वचनबद्ध असल्याची ग्वाही देत, राज्याच्या सीमावर्ती भागातल्या नागरिकांच्या हितसंबंधांचं रक्षण करण्यासाठी सरकारकडून होत असलेल्या प्रयत्नांची त्यांनी माहिती दिली.

-------------------------------------------

**विधानसभा कामकाज/शोकप्रस्ताव**

विधानसभेचं कामकाज सुरु झाल्यानंतर दिवंगत माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाबद्दल श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. हा शोकप्रस्ताव मांडताना मुख्यमंत्र्यांनी अजित पवार यांच्या कार्याला उजाळा दिला. धाडसी स्वभाव, कामात सातत्य, कार्यमग्नता, नियोजनबद्ध काम या अजित पवार यांच्या स्वभाव वैशिष्ट्यांचा त्यांनी उल्लेख केला. विधानपरिषदेत उप-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अजित पवार यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडला. यावेळी शिंदे यांनी अजित पवार यांच्या कार्याचा गुणगौरव केला. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, काँग्रेस नेते सतेज पाटील, शशिकांत शिंदे, प्रवीण दरेकर, विक्रम काळे यांनीही अजित पवार यांच्याबद्दल आपल्या भावना व्यक्त केल्या. दरम्यान दिवंगत उप-मुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताची सीबीआय चौकशी करण्याच्या सूचना देण्याची विनंती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना केली आहे. मुंबईत वार्ताहर परिषदेत फडणवीस यांनी ही माहिती दिली. या अपघाताविषयी असलेल्या सर्व शंका दूर करण्यासाठी सरकार प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितलं.

-------------------------------------------

**भारत टॅक्सी**

देशातली पहिली सहकारी कॉल टॅक्सी सेवा, भारत टॅक्सीच्या सदस्य चालकांशी, केंद्रीय सहकार मंत्री, अमित शहा यांनी आज नवी दिल्ली इथं संवाद साधला. या सेवेचं उद्दिष्ट चांगली सेवा देण्याबरोबरच टॅक्सी चालकांचं हित साधणं असं असल्याचं, शहा यांनी स्पष्ट केलं. भारत टॅक्सी सेवेवर चालकांसाठीही ऑनलाईन तक्रार नोंदवण्याची सुविधा उपलब्ध करुन दिली जाईल, असं ते म्हणाले.

***(होल्ड बाईट- केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा)***

-------------------------------------------

**‘आदिवासी पाडा तिथे एसटी’**

मंत्री प्रताप सरनाईक यांनी, राज्यातील दुर्गम आदिवासी भागांसाठी ‘आदिवासी पाडा तिथे एसटी’ असा संकल्प जाहीर केला आहे. सह्याद्री आणि मेळघाटातील अतिदुर्गम आदिवासी पाड्यांपर्यंत एसटी सेवा पोहोचवण्यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ नऊ मीटर लांबीच्या, ३५ आसनी १०० मिडी बसेस खरेदी करणार आहे. या बसेसना ‘पुण्यश्लोक अहिल्यादेवी’ असे नामकरण करण्यात येणार असून, अरुंद रस्ते आणि घाटमार्गांसाठी त्या विशेष उपयुक्त असतील.ही बससेवा केवळ वाहतूक नव्हे, तर आदिवासी समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहाशी जोडणारा सामाजिक सेतू ठरेल असा विश्वास सरनाईक यांनी व्यक्त केला आहे.

-------------------------------------------

**परिवहन आयुक्त**

राजेश नार्वेकर यांची राज्याच्या परिवहन आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली असून, ते यापूर्वी अन्न आणि औषध प्रशासन विभागात आयुक्त म्हणून कार्यरत होते. विद्यमान परिवहन आयुक्त विवेक भीमनवार यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोग अध्यक्षपदी नियुक्ती झाल्यानंतर ही नियुक्ती करण्यात आली आहे. २००९ बॅचचे आयएएस अधिकारी असलेले नार्वेकर यांनी, ठाणे जिल्हाधिकारी, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त, रायगड जि.प. सीईओ अशी महत्त्वाची पदे भूषवली आहेत.

-------------------------------------------

**अमरावती विद्यापीठ दीक्षांत सोहळा**

तरुण पिढी ही केवळ देशाचे नागरिक नसून ती भारताच्या परिवर्तनाचा आणि प्रगतीचा एक अविभाज्य भाग आहे. येणा-या काळात विविध क्षेत्रांतील नेतृत्वाची धुरा तुम्हा तरुणांच्या खांद्यावर असेल, युवा शक्ती हीच भारताच्या प्रगतीची खरी ओळख असल्याचे प्रेरणादायी उद्गार भारतीय लष्कराचे माजी प्रमुख जनरल मनोज पांडे यांनी काढले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या ४२वा दीक्षांत समारंभामध्ये प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. जनरल मनोज पांडे यांनी याप्रसंगी पदवी प्राप्त केलेल्या

विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी 'तीन C' चा मंत्र दिला. चरित्र, क्षमता आणि आचरण हे यशाचे तीन आधारस्तंभ आहेत. प्रामाणिकपणा, निष्ठा आणि नैतिक धैर्य हे उत्तम माणसाचे लक्षण आहे असं, त्यांनी सांगितलं. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या ४२व्या दीक्षांत समारंभामध्ये, डॉ.कमल रामक्रिष्ण गवई यांना मानव विज्ञान विद्याशाखेंतर्गत, राज्यशास्त्र विषयात वाङ्मय पंडित अर्थात, डी.लिट या सर्वोच्च पदवीने सन्मानित करण्यात आल. त्याचप्रमाणे विद्या शाखानिहाय ४६६ संशोधकांना, आचार्य पदवी देवून, सन्मानित करण्यात आले.

-------------------------------------------

**गाडगे महाराज जयंती**

संत गाडगे महाराज यांची दीडशेवी जयंती आज साजरी होत आहे. यानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्षा या निवासस्थानी संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. संत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी देखील लोकभवन इथे त्यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केलं. यावेळी लोकभवनातले अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

-------------------------------------------

**बाळासाहेब आंबेडकर**

भारताचे स्वतःचे असे परराष्ट्र धोरण राहणार नसून, जे धोरण अमेरिका स्वीकारेल तेच आपल्याला स्वीकारावं लागेल असा आरोप वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष, एडवोकेट बाळासाहेब आंबेडकर यांनी आज नागपूरमध्ये पत्रकार परिषदेत केला. देशाच सार्वभौमत्व आरएसएस आणि भाजपाने गहाण ठेवले असल्याची देखील टीका त्यांनी केली.

-------------------------------------------

**हवामान-अवकाळी पाऊस**

नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने येणाऱ्या तीन तासांसाठी येलो अलर्ट जारी केला असून, नागपूर, भंडारा, वर्धा, चंद्रपूर, यवतमाळ आणि गडचिरोली जिल्हा इथं विजांच्या कडकडाटासह वादळी वारे आणि हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. वादळी वाऱ्याचा वेग ताशी ३० ते ४० किमीपर्यंत जाण्याची शक्यता असून, नागरिकांनी सतर्क राहण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. विदर्भातील अनेक जिल्ह्यांत आज पहाटेपासून विजांच्या कडकडाटासह गारपीट आणि पावसाची नोंद झाली. या अवकाळी पावसाचा तडाखा, यवतमाळ जिल्ह्यातील राळेगाव तालुक्यातील पिकांना बसला असल्याचं, आमच्या प्रतिनिधींनी कळवलं आहे. सोसाट्याच्या वाऱ्यात अनेक झाड उन्मळून पडल्याने, काही

घरांचे देखील नुकसान झाले आहे. राळेगाव, कळमनेर, कापसी, रामतीर्थ, वाळधुर, शेळी आणि कोपरीसह अनेक गावांत गारपीट झाली. ज्यात गहू, हरभरा या पिकांचं नुकसान झालं. महागाव तालुक्यात देखील कालरात्री अवकाळी पावसाने दखल देत गहू, चणा, ज्वारी अशा पिकांना संकटात टाकलं आहे. भंडारा आणि नागपूर जिल्हयात देखील अवकाळी पावसाने हजेरी लावली. भंडाऱ्यात सकाळपासून ढगांच्या गडगडाटासह जोरदार सरी कोसळल्याने काढणीला आलेल्या चना, वाटाणा आणि लाखोळी पिकांना धोका निर्माण झाला असून, शेतकरी चिंतेत आहेत. दरम्यान, नागपूरातही पहाटे वीज, वारा आणि पावसाने साधारण अर्धातास हजेरी लावल्याने वातावरणात गारवा निर्माण झाला. परंतु अनेक ठिकाणी झाडांच्या फांद्या तुटल्या आणि वीज प्रवाह खंडित झाला.

-------------------------------------------

**टी-ट्वेंटी क्रिकेट**

टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज झिंबाब्वेविरुद्ध वेस्ट इंडीज हा सामना, मुंबईच्या वानखेडे स्टेडीयमवर होणार आहे. सामना सायंकाळी सात वाजता सुरु होईल. गुण तालिकेत आता दक्षिण आफ्रिका, इंग्लंड प्रत्येकी दोन गुण मिळवून पुढे आहेत. न्यूझीलंड आणि पाकिस्तानला प्रत्येकी एक गुण मिळाला आहे.

-------------------------------------------

**अमरावती ग्रामपंचायत**

अमरावती जिल्हयातील ५५५ ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचे पडघम वाजू लागले आहेत. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, २० फेब्रुवारी रोजी तहसीलदारांनी संबंधित गावांचे नकाशे ताब्यात घेतले असून, प्रभाग रचनेचे काम सुरू केले आहे. महसूल आणि ग्रामविकास प्रशासनाच्या देखरेखीखाली हे काम सुमारे दीड महिना चालणार असून, ३० मार्च रोजी मतदार संघाचे प्रारूप घोषित केले जाईल. या प्रारूप रचनेवर तेरा एप्रिलपर्यंत हरकती आणि सूचना नोंदवता येणार आहेत.

-------------------------------------------

**सोने चांदी दर**

सोन्याचांदीच्या दरांवर सरकारचं बारकाईने लक्ष असल्याची ग्वाही केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी दिली. सणासुदीला किंवा लग्नसराईच्या दिवसात सोन्याचे दर वाढतात, पण त्यात चिंताजनक बदल झालेले नाहीत, असं त्या म्हणाल्या. केंद्रीय अर्थसंकल्प संसदेत सादर झाल्यानंतरच्या वार्ताहर परिषदेत रिझर्व बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्यासह त्या बोलत होत्या.

-------------------------------------------